Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

| |
|---|
| **A** |

# Paper-II
# ECONOMICS

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................
   (Name) ................................................
2. (Signature) ........................................
   (Name) ................................................

Seat No. | | | | | | | |
(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................
(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |
(To be filled by the Candidate)

## MAR - 11223

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **48** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा.** : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

# Economics
## Paper II
## अर्थशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Consider the pair of goods X or Y. It is observed that when price of Y falls, the demand for X also falls. Which one of the following options would you choose regarding the nature of these goods ?

   (A) They are complementary goods

   (B) They are substitute goods

   (C) They are inferior goods

   (D) They are giffen goods

2. In the third stage of production, the total product is :

   (A) Rising

   (B) Constant

   (C) Maximum

   (D) Falling but positive

1. क्ष आणि य वस्तूंची जोडी आहे असे समजा. असे दिसून येते की, जेंव्हा य वस्तूची किंमत घटते तेंव्हा क्ष वस्तूची मागणी देखील घटते. या वस्तूंच्या स्वरूपाबद्दल आपण पुढीलपैकी कोणता पर्याय निवडाल ?

   (A) या वस्तू पूरक आहेत

   (B) या वस्तू पर्यायी आहेत

   (C) या वस्तू कनिष्ठ आहेत

   (D) या वस्तू गिफेन वस्तू आहेत

2. उत्पादनाच्या तिसऱ्या अवस्थेत एकूण उत्पादन ....................

   (A) वाढते

   (B) स्थिर राहते

   (C) महत्तम असते

   (D) घटते परंतु धनात्मक असते

3. According to Kenneth Arrow people do not prefer :
   (A) Flight insurance
   (B) Property insurance
   (C) Life insurance
   (D) Flood insurance

4. The basic objective of applying the game theory is :
   (A) To maximise profits
   (B) To maximise sale
   (C) To arrive at the dominant strategy
   (D) To minimize marginal cost

5. Other things remaining constant, if a competitor of commodity X carries out a successful advertisement campaign, the demand curve for X shall .................. .
   (A) Shift to the left
   (B) Shift to the right
   (C) Become positively sloping
   (D) Become parallel to Y axis

3. केनेथ ॲरोच्या मतानुसार लोक .................. पसंत करीत नाहीत.
   (A) उड्डाण विमा
   (B) संपदा विमा
   (C) आयुर्विमा
   (D) पूर विमा

4. खेळ सिद्धांत लागू करण्याचे मूलभूत उद्दिष्ट .................. आहे.
   (A) महत्तम नफा
   (B) महत्तम विक्री
   (C) प्रभावी निर्णय (व्यूहरचना)
   (D) सीमान्त व्यय कमी करणे

5. इतर परिस्थिती स्थिर असताना, जर एखादा क्ष वस्तूचा स्पर्धक यशस्वी जाहिरात मोहीम करत असेल तर क्ष वस्तूचा मागणी वक्र ...............
   (A) डावीकडे सरकतो
   (B) उजवीकडे सरकतो
   (C) धन उताराचा होतो
   (D) य अक्षाला समांतर होतो

6. The payment to the input is in fixed supply in the short-run is called :

(A) Economic rent

(B) Quasi rent

(C) Transfer earnings

(D) Producer's surplus

7. A necessary (but not sufficient) condition for the existence of a general equilibrium is .................. .

(A) Number of independent equations and number of unknowns must be the same

(B) Prices of all goods should be equal

(C) Supply of factors and prices of goods must be equal

(D) Demand for factors and supply of goods should be the same

6. अल्पकाळात स्थिर पुरवठा असलेल्या घटकास केलेल्या अधिदानास ................ असे म्हणतात.

(A) आर्थिक खंड

(B) प्रतिरूप खंड

(C) हस्तांतर उत्पन्न

(D) उत्पादकाचे आधिक्य

7. सर्वसाधारण संतुलनाच्या अस्तित्वासाठी एक आवश्यक (परंतु अपुरी) अट म्हणजे .......... ही होय.

(A) स्वतंत्र समीकरणांची संख्या आणि अज्ञातांची संख्या सारखी असलीच पाहिजे

(B) सर्व वस्तूंच्या किंमती सारख्या असल्याच पाहिजेत

(C) घटकांचा पुरवठा आणि वस्तूंच्या किंमती सारख्या असल्याच पाहिजेत

(D) घटकांची मागणी आणि वस्तूंचा पुरवठा सारखाच असला पाहिजे

8. Walras argued that all .............. and ..................... in all markets are determined simultaneously through their interaction with one another.

(A) Prices, quantities

(B) Demand, prices

(C) Supply, prices

(D) Prices, costs

9. Suppose Anil and Sunil are at an allocation bundle where their marginal rates of substitution are not equal, then ............... .

(A) There are losses from exchange

(B) There are gains from exchange

(C) They are outside the Edgeworth box

(D) They are at an equilibrium

8. वॉलरसाच्या मते सर्व बाजारातील सर्व ............ त्यांच्या परस्पर आंतरक्रियांच्या माध्यमातून एकाचवेळी सुनिश्चित केल्या जातात.

(A) किंमती आणि नगसंख्या

(B) मागणी आणि किंमती

(C) पुरवठा आणि किंमती

(D) किंमती आणि व्यय

9. समजा अनिल आणि सुनिल यांच्यात एका वस्तुसंचाचे वितरण असे झाले आहे की ज्यामुळे त्यांचा सीमान्त पर्यायता दर समान नाही अशा वेळी :

(A) विनिमयातून तोटा होतो

(B) विनिमयातून लाभ मिळतात

(C) ते एजवर्थ पेटिकेच्या बाहेर असतात

(D) ते संतुलन स्थितीत असतात

10. Second fundamental theorem of welfare economics assumes that all consumers and producers are :

(A) Price leaders

(B) Price makers

(C) Price takers

(D) Price followers

11. Arrow's impossibility theorem argues that :

(A) It is impossible to devise strong social ordering

(B) It is possible to devise weak social ordering

(C) It is impractical to find political solutions to economic problems

(D) Social choice is always optimum

10. कल्याणाच्या दुसऱ्या मूलभूत प्रमेयानुसार उपभोक्ते आणि उत्पादक ................ असे गृहीत धरले जाते.

(A) किंमत नेतृत्व करणारे

(B) किंमत ठरवणारे आहेत

(C) किंमत स्वीकारणारे आहेत

(D) किंमत अनुयायी आहेत

11. ॲरोच्या अशक्यता प्रमेयानुसार :

(A) सुनिश्चित सामाजिक क्रमवारी माहित करणे अशक्य आहे

(B) अनिश्चित सामाजिक क्रमवारी माहित करणे शक्य आहे

(C) आर्थिक समस्यांवर राजकीय उपाय माहित करणे अव्यवहार्य आहे

(D) सामाजिक निवड नेहमी पर्याप्त असते

12. Recession means :

(A) Period of increasing prices

(B) Period during which aggregate output decreases

(C) Period of declining unemployment

(D) Period of increased trade

13. A cut in tax rate for reducing the cost of capital and encouraging business investment is an example of ................. .

(A) Expansionary demand side policy

(B) Contractionary demand side policy

(C) Expansionary supply side policy

(D) Contractionary supply side policy

12. मंदी म्हणजे :

(A) वाढणाऱ्या किंमतींचा काळ

(B) एकूण उत्पादन घटण्याचा काळ

(C) बेरोजगारी घटण्याचा काळ

(D) वाढत्या व्यापाराचा काळ

13. भांडवलाचा खर्च कमी करणे व व्यवसायातील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी करदरात घट करणे हे पुढीलपैकी कशाचे उदाहरण आहे ?

(A) विस्तारित मागणीजन्य धोरण

(B) संकुचित मागणीजन्य धोरण

(C) विस्तारित पुरवठाजन्य धोरण

(D) संकुचित पुरवठाजन्य धोरण

14. Which of the following has a positive impact on investment ?

(A) An increase in the nominal interest rate

(B) A higher capital stock

(C) An expected decline in the demand for goods

(D) An increase in expected inflation with unchanged nominal interest rate

15. The opportunity cost of holding money is called as :

(A) Nominal interest rate

(B) Inflation

(C) The real return on investment

(D) Savings

14. पुढीलपैकी कोणता घटक गुंतवणुकीवर सकारात्मक परिणाम करतो ?

(A) नाममात्र व्याजदरातील वाढ

(B) भांडवलाचा मोठा साठा

(C) वस्तूंच्या मागणीतील अपेक्षित घट

(D) न बदललेला नाममात्र व्याजदर व भाव-फुगवट्यातील अपेक्षित वाढ

15. पैसा बाळगण्याचा संधीत्याग खर्च म्हणजे :

(A) नाममात्र व्याज दर

(B) चलन फुगवटा

(C) गुंतवणुकीवरील वास्तव परतावा

(D) बचत

16. If the nominal money supply grows by 4% per year, velocity is constant and the real GDP grows by 1% per year, inflation would be ................ .

(A) 1%

(B) 2%

(C) 3%

(D) 4%

17. In the equation $C = a + bY$ describing the aggregate consumption function, $a$ stands for :

(A) The amount of consumption when income is zero

(B) Marginal propensity to consume

(C) The amount of consumption when the income is maximum

(D) Marginal propensity to save

16. जर पैशाचा नाममात्र पुरवठा प्रतिवर्षी 4 टक्क्यांनी वाढला, भ्रमणवेग स्थिर असेल व वास्तव एकूण देशांतर्गत उत्पन्न प्रतिवर्षी 1 टक्क्यांनी वाढत असेल तर चलनफुगवटा किती टक्के असेल ?

(A) 1 टक्का

(B) 2 टक्के

(C) 3 टक्के

(D) 4 टक्के

17. एकूण उपभोग फलन दर्शविणाऱ्या $C = a + bY$ या समीकरणातील $a$ म्हणजे :

(A) उत्पन्न शून्य असतानाचा उपभोग

(B) सीमांत उपभोग प्रवृत्ती

(C) उत्पन्न महत्तम असतानाचा उपभोग

(D) सीमांत बचत प्रवृत्ती

18. Classical economists argued that money is neutral because ............. .

    (A) Prices adjust to a monetary expansion only in the long-run

    (B) Prices are slow to adjust to a monetary expansion

    (C) Prices are fixed in the short-run

    (D) Prices adjust quickly to a monetary expansion

19. As Marginal Propensity to Save (MPS) increases, the value of multiplier would :

    (A) Increase

    (B) Increase or decrease depending upon the size of change in investment

    (C) Remain constant

    (D) Fall

18. पैसा उदासीन असतो असे प्रतिपादन सनातनी अर्थतज्ञांनी केले कारण :

    (A) फक्त दीर्घकाळातच किंमती पैशाच्या विस्ताराशी जुळवून घेतात

    (B) पैशाच्या विस्ताराशी किंमती अगदी हळूहळू जुळवून घेतात

    (C) अल्पकाळात किंमती स्थिर असतात

    (D) पैशाच्या विस्ताराशी किंमती अतिशय जलदतेने जुळवून घेतात

19. सीमांत बचत प्रवृत्ती वाढली असता गुणकाचे मूल्य ....................

    (A) वाढते

    (B) गुंतवणुकीच्या बदलाच्या आकारानुसार वाढते किंवा कमी होते

    (C) स्थिर राहते

    (D) घटते

20. What happens if the injections are less than the leakages at full employment level of national income ?

(A) Inflationary Gap

(B) Equilibrium

(C) Hyper-inflation

(D) Deflationary Gap

21. The price of money next year in terms of money, this year is expressed as .................. .

(A) 1 + real interest rate

(B) 1 + nominal interest rate

(C) $\frac{1}{1 + \text{real interest rate}}$

(D) $\frac{1}{1 + \text{nominal interest rate}}$

20. राष्ट्रीय उत्पन्न पूर्ण रोजगार पातळीवर असतांना गळतीपेक्षा प्रतिभरणे कमी असल्यास पुढीलपैकी काय होते ?

(A) चलनविस्तारजन्य दरी

(B) संतुलन

(C) अतिरिक्त भाववाढ

(D) चलनसंकोचजन्य दरी

21. ह्या वर्षीच्या पैशांच्या स्वरूपात पुढील वर्षातील पैशाची किंमत कशी व्यक्त होते ?

(A) 1 + वास्तव व्याज दर

(B) 1 + नाममात्र व्याज दर

(C) $\frac{1}{1 + \text{वास्तव व्याज दर}}$

(D) $\frac{1}{1 + \text{नाममात्र व्याज दर}}$

22. If $X_1, X_2, X_3, \ldots\ldots\ldots\ldots, X_n$ is a random sample from a normally distributed population with mean $\mu$ and variance $\sigma^2$, the sampling distribution of $\bar{X}$ is :

(A) Normal with mean $\mu$ and variance $\sigma^2$

(B) Normal with mean $\mu$ and variance $\sigma^2 / n^2$

(C) Normal with mean $\mu$ and variance $\sigma^2 / n$

(D) Cannot say

23. The logistic regression model is used to analyze :

(A) Discrete choice

(B) Continuous choice

(C) National income

(D) Incorrectly measured data

22. समजा $X_1, X_2, X_3, \ldots\ldots\ldots, X_n$ हा $\mu$ ही सरासरी आणि $\sigma^2$ हे विचलन असलेल्या प्रसामान्य लोकसंख्येतून घेतलेला स्वैर नमुना आहे, तर $\bar{X}$ चे नमुना वितरण खालीलपैकी कोणते असेल ?

(A) सरासरी $\mu$ आणि विचलन $\sigma^2$ असलेले प्रसामान्य

(B) सरासरी $\mu$ आणि $\sigma^2 / n^2$ हे विचलन असलेले प्रसामान्य

(C) सरासरी $\mu$ आणि $\sigma^2 / n$ हे विचलन असलेले प्रसामान्य

(D) सांगता येत नाही

23. लॉजिस्टीक प्रतिपगमन प्रतिमान खालील कशाचे विश्लेषण करण्यासाठी वापरतात ?

(A) विविक्त निवड

(B) सलग निवड

(C) राष्ट्रीय उत्पन्न

(D) चुकीची आकडेवारी असते तेंव्हा

24. ARIMA ($p$, $d$, $q$) models are used to analyze :

(A) cross-section data

(B) discrete data

(C) time series data

(D) unstable data

25. The estimate of $\hat{b}$ in the following regression model $Y_i = \alpha + \beta X_i + e_i$ is given by :

(A) $\hat{b} = \frac{\Sigma(X_i - \bar{X})(Y_i - \bar{Y})}{\Sigma(X_i - \bar{X})^2}$

(B) $\hat{b} = \bar{Y} - \hat{\alpha}\bar{X}$

(C) $\hat{b} = \frac{\Sigma(X_i - \bar{X})(Y_i - \bar{Y})}{\sqrt{\Sigma(X_i - \bar{X})}}$

(D) $\hat{b} = \frac{\Sigma(X_i - \bar{X})^2}{\Sigma(Y_i - \bar{Y})^2}$

24. ARIMA ($p$, $d$, $q$) प्रतिमान खालील कोणत्या संदर्भात वापरतात ?

(A) काटच्छेद विश्लेषण

(B) विविक्त आकडेवारी

(C) काल शृंखला

(D) अस्थिर विदा

25. $Y_i = \alpha + \beta X_i + e_i$ ह्या रेषीय प्रतिपगमन प्रतिमानात $\hat{b}$ ची किंमत खालील असते :

(A) $\hat{b} = \frac{\Sigma(X_i - \bar{X})(Y_i - \bar{Y})}{\Sigma(X_i - \bar{X})^2}$

(B) $\hat{b} = \bar{Y} - \hat{\alpha}\bar{X}$

(C) $\hat{b} = \frac{\Sigma(X_i - \bar{X})(Y_i - \bar{Y})}{\sqrt{\Sigma(X_i - \bar{X})}}$

(D) $\hat{b} = \frac{\Sigma(X_i - \bar{X})^2}{\Sigma(Y_i - \bar{Y})^2}$

26. In the following regression model $Y_i = \alpha + \beta X_i + e_i$, under the usual assumptions, variance of $\hat{b}$ is given by :

(A) $\sigma^2$

(B) $\frac{\sigma^2}{\Sigma(X_i - \bar{X})^2}$

(C) $\frac{\Sigma(X_i - \bar{X})^2}{\sigma^2}$

(D) $\frac{\Sigma(Y_i - \bar{Y})^2}{\sigma^2}$

27. For the following input-output table, what would be the technology matrix ?

| **Sector** | **A** | **B** | **Final Demand** |
|---|---|---|---|
| A | 50 | 150 | 200 |
| B | 100 | 75 | 100 |

(A) $M = \begin{bmatrix} 1/8 & 6/11 \\ 1/4 & 3/11 \end{bmatrix}$

(B) $M = \begin{bmatrix} 3/11 & 1/8 \\ 6/11 & 1/4 \end{bmatrix}$

(C) $M = \begin{bmatrix} 1/4 & 1/8 \\ 3/11 & 6/11 \end{bmatrix}$

(D) $M = \begin{bmatrix} 6/11 & 1/8 \\ 3/11 & 1/4 \end{bmatrix}$

26. $Y_i = \alpha + \beta X_i + e_i$ ह्या रेषीय प्रतिपगमन प्रतिमानात, नेहमीची गृहितके लागू असतात तेव्हा, $\hat{b}$ चे विचलन खालीलपैकी कोणते असते ?

(A) $\sigma^2$

(B) $\frac{\sigma^2}{\Sigma(X_i - \bar{X})^2}$

(C) $\frac{\Sigma(X_i - \bar{X})^2}{\sigma^2}$

(D) $\frac{\Sigma(Y_i - \bar{Y})^2}{\sigma^2}$

27. निम्न निर्देशित निविष्टी-उद्दिष्टी तक्त्यासाठी तांत्रिक सारणी कोणती राहील ?

| **क्षेत्र** | **A** | **B** | **अंतिम मागणी** |
|---|---|---|---|
| A | 50 | 150 | 200 |
| B | 100 | 75 | 100 |

(A) $M = \begin{bmatrix} 1/8 & 6/11 \\ 1/4 & 3/11 \end{bmatrix}$

(B) $M = \begin{bmatrix} 3/11 & 1/8 \\ 6/11 & 1/4 \end{bmatrix}$

(C) $M = \begin{bmatrix} 1/4 & 1/8 \\ 3/11 & 6/11 \end{bmatrix}$

(D) $M = \begin{bmatrix} 6/11 & 1/8 \\ 3/11 & 1/4 \end{bmatrix}$

28. Suppose that the total cost of producing $x$ units of a product is $c(x) = x^3 - 6x^2 + 15x$. Find the number of units for which the average cost A($x$) is minimum.

(A) $x = 5$

(B) $x = 7$

(C) $x = 1$

(D) $x = 3$

29. For the demand function :

$$3x + 4y = 10$$

where $y$ is the price per unit and $x$ is the number of units, find total revenue and marginal revenue.

(A) $5/2x - 3/4x^2$, $5/2 - 3/2x$

(B) $2/5x - 4/3x^2$, $2/5 - 4/3x$

(C) $1/5x - 2/3x^2$, $1/5 - 2/3x$

(D) $3/4x - 5/2x^2$, $3/4 - 5/2x$

28. समजा $x$ वस्तूंच्या उत्पादनासाठी एकूण व्यय $c(x) = x^3 - 6x^2 + 15x$ असेल तर $x$ वस्तूंच्या किती एककासाठी सरासरी व्यय A($x$) न्युनतम स्तरावर राहील ?

(A) $x = 5$

(B) $x = 7$

(C) $x = 1$

(D) $x = 3$

29. पुढील मागणी फलासाठी एकूण प्राप्ती आणि सीमांत प्राप्ती शोधून काढा :

$$3x + 4y = 10$$

यात $y$ प्रती एकक किंमत दर्शविते आणि $x$ नगांची संख्या दर्शविते.

(A) $5/2x - 3/4x^2$, $5/2 - 3/2x$

(B) $2/5x - 4/3x^2$, $2/5 - 4/3x$

(C) $1/5x - 2/3x^2$, $1/5 - 2/3x$

(D) $3/4x - 5/2x^2$, $3/4 - 5/2x$

30. Agricultural production in India increases in Arithmetic progression beginning from 2000. If production in 2004 and 2014 was 68 and 88 mn tonnes, then estimate production of 2017.

(A) 98

(B) 93

(C) 91

(D) 94

30. भारतातील शेतकी उत्पादनाची वाढ 2000 पासून गणितीय श्रेढीनुसार होते. 2004 आणि 2014 मध्ये जर उत्पादन 68 आणि 88 मिलियन टन्स इतके झाल्यास 2017 मधील अंदाजित शेतकी उत्पादन किती असेल ?

(A) 98

(B) 93

(C) 91

(D) 94

31. Marginal cost function is obtained by :

(A) Integrating the total cost function

(B) Differentiating the fixed cost function

(C) Integrating total variable cost function

(D) Differentiating total cost or variable cost function

31. सीमांत व्यय फल पुढीलपैकी कोणत्या मार्गाने प्राप्त होऊ शकेल ?

(A) एकूण व्यय फलाचे एकात्मीकरण

(B) स्थिर व्यय फलाचे व्यवच्छेदन

(C) एकूण चल व्यय फलाचे एकात्मीकरण

(D) एकूण व्यय किंवा चल व्यय फलाचे व्यवच्छेदन

32. The intersection of the offer curves of two nations shows :

(A) The equilibrium relative commodity price at which trade takes place between two nations

(B) The equilibrium relative currency price at which trade takes place between two nations

(C) The equilibrium relative factor price at which trade takes place between two nations

(D) The equilibrium relative technology price at which trade takes place between two nations

33. The International Development Agency (IDA) was established in ................ and it has its headquarters in .................. .

(A) 1960 — Geneva

(B) 1960 — Washington

(C) 1955 — Rome

(D) 1960 — New York

32. दोन देशांच्या देयता वक्राचा छेदनबिंदू ............. हे दर्शवितो.

(A) समतोल सापेक्ष वस्तू किंमत की ज्यावर दोन राष्ट्रांत व्यापार होतो

(B) समतोल सापेक्ष चलन किंमत की ज्यावर दोन राष्ट्रांत व्यापार होतो

(C) समतोल सापेक्ष घटक किंमत की ज्यावर दोन राष्ट्रांत व्यापार होतो

(D) समतोल सापेक्ष तंत्रज्ञान किंमत की ज्यावर दोन राष्ट्रांत व्यापार होतो

33. इंटरनॅशनल डेव्हलपमेंट एजन्सीची स्थापना ..................... मध्ये झाली असून तीचे मुख्यालय .................... येथे आहे.

(A) 1960 — जिनिव्हा

(B) 1960 — वॉशिंग्टन

(C) 1955 — रोम

(D) 1960 — न्यूऑर्क

34. Linder's spillover theory is applicable to trade in .................... .

(A) Agricultural goods

(B) Manufactured goods

(C) Services

(D) Defence equipments

35. When a small nation imposes an import tariff .................. .

(A) The domestic price of the importable commodity decreases by the full amount of the tariff for consumers in the nation

(B) The domestic price of the importable commodity rises by the full amount of the tariff for consumers in the nation

(C) The domestic price of the importable commodity remains constant for consumers in the nation

(D) The domestic prices of the inputs of importable commodity rises by the full amount of the tariff for producers in the nation

34. लिंडरचा सांडवन सिद्धांत .................. व्यापारास लागू होतो.

(A) कृषी वस्तू

(B) कारखानदारी वस्तू

(C) सेवा

(D) संरक्षण वस्तू

35. जेंव्हा छोटा देश आयात जकाती लादतो तेव्हा ....................

(A) देशातील उपभोक्त्यांसाठी आयातक्षम वस्तूची देशांतर्गत किंमत पूर्ण जकात रकमेइतकी घटते

(B) देशातील उपभोक्त्यांसाठी आयातक्षम वस्तूची देशांतर्गत किंमत पूर्ण जकात रकमेइतकी वाढते

(C) देशांतर्गत उपभोक्त्यांसाठी आयातक्षम वस्तूची देशांतर्गत किंमत स्थिर राहते

(D) देशांतर्गत उत्पादकांसाठी आयातक्षम वस्तूच्या आदानांच्या किंमती पूर्ण जकात रकमेइतक्या वाढतात

36. China's currency was included in the Special Drawing Rights (SDR) composition in .................. .

(A) 2016

(B) 2010

(C) 1964

(D) 2017

37. Increase in the supply of money in the economy leads to ................ .

(A) Trade surplus

(B) Trade equilibrium

(C) Trade deficit

(D) Rise in rate of interest

38. According to the Product Cycle Hypothesis, innovation leads to ........................ for the innovating country.

(A) Absolute monopoly

(B) Relative monopoly

(C) Temporary monopoly

(D) Long-term monopoly

36. विशेष उचल अधिकार घटकात चीनच्या चलनाचा अंतर्भाव .................... या वर्षी झाला.

(A) 2016

(B) 2010

(C) 1964

(D) 2017

37. अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा वाढल्यास त्याचा परिणाम .................... असा होतो.

(A) व्यापार आधिक्य

(B) व्यापार समतोल

(C) व्यापार तूट

(D) व्याजदरात वाढ

38. उत्पादन चक्र गृहितकान्वये नवोन्मेशकारी देशाकरिता नवोन्मेशाचा परिणाम पुढीलप्रमाणे होतो.

(A) निव्वळ मक्तेदारी

(B) तुलनात्मक मक्तेदारी

(C) तात्पूर्ती मक्तेदारी

(D) दीर्घकालीन मक्तेदारी

39. Which concept of the terms of trade attempts to capture productivity in export and import competing sectors of a country ?

(A) Gross Barter Terms of Trade

(B) Net Barter Terms of Trade

(C) Income Terms of Trade

(D) Double Factoral Terms of Trade

40. **Statement 1 :** Any change that affects that IS, LM and BP curves can affect the nation's aggregate demand curve.

**Statement 2 :** Aggregate demand curve of the nation depends whether the nation operates under fixed or flexible exchange rate.

(A) Both the statements 1 and 2 are incorrect

(B) Both the statements 1 and 2 are correct

(C) Statement 1 is correct but the statement 2 is incorrect

(D) Statement 1 is incorrect but the statement 2 is correct

39. व्यापार शर्तीची कोणती संकल्पना राष्ट्राच्या आयात व निर्यात स्पर्धा क्षेत्रात उत्पादकता साध्य करण्याचा प्रयास करते ?

(A) स्थूल वस्तू व्यापार शर्ती

(B) निव्वळ वस्तू व्यापार शर्ती

(C) उत्पन्न व्यापार शर्ती

(D) द्विघटक व्यापार शर्ती

40. **विधान 1 :** आय एस, एल एम व व्यवहारतोल वक्रावर परिणाम करणारा कोणताही बदल देशाच्या समग्र मागणी वक्रावर परिणाम करू शकतो.

**विधान 2 :** देशाचा समग्र मागणी वक्र देश स्थिर अथवा बदलला विनिमय दरापैकी कशा अंतर्गत कार्यरत आहे यावर निर्भर असते.

(A) विधान 1 व विधान 2 ही दोन्ही विधाने चूक आहेत

(B) विधान 1 व विधान 2 ही दोन्ही विधाने बरोबर आहेत

(C) विधान 1 बरोबर आहे परंतु विधान 2 चूक आहे

(D) विधान 1 चूक आहे परंतु विधान 2 बरोबर आहे

41. The World Bank mainly finances ................ sector and it mostly gives .................... loans.

(A) Agricultural — Short term

(B) Industry — Long term

(C) Energy — Medium + Long term

(D) Transport — Long term

42. Which one of the following is a cause of market failure ?

(A) Consumption is rival

(B) Exclusion is not feasible and consumption is non-rival

(C) Say's law of market

(D) Exclusion is feasible

43. Market functions on the principle of :

(A) Equimarginal

(B) Exclusion

(C) Inclusion

(D) Perfection

41. जागतिक बँक प्रामुख्याने .................. क्षेत्राला .................. प्रकारचा वित्त पुरवठा करते.

(A) कृषी – अल्पकालीन

(B) उद्योग – दीर्घकालीन

(C) ऊर्जा – मध्यम + दीर्घकालीन

(D) वाहतूक – दीर्घकालीन

42. बाजार अपयशाचे खालीलपैकी कोणते कारण आहे ?

(A) उपभोग प्रतिस्पर्धात्मक आहे

(B) वर्जन शक्य नाही आणि उपभोग अ-प्रति-स्पर्धात्मक आहे

(C) से चा बाजाराचा नियम

(D) वर्जन शक्य आहे

43. बाजार .................. तत्त्वावर कार्य करते.

(A) समसीमांत

(B) वर्जन

(C) समावेशन

(D) परिपूर्णत्व

44. The claim that market mechanism leads to efficient resource use is based on the condition of ............. .

(A) Monopoly

(B) Inclusion

(C) Competitive factor and product market

(D) Exclusion

45. The marginal cost of providing public goods to one additional person is equal to :

(A) Zero

(B) Between one and zero

(C) Between minus one and zero

(D) Between minus one and one

46. Externality is defined as the ............. by a non-consumer which is not included in the price of the commodity concerned.

(A) Cost incurred

(B) Benefit enjoyed

(C) Cost incurred or benefit enjoyed

(D) Cost of a commodity produced

44. बाजार यंत्रणेमुळे साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर होतो हा दावा ...................... या स्थितीवर अवलंबून असतो.

(A) मक्तेदारी

(B) समावेशन

(C) स्पर्धात्मक घटक आणि वस्तू बाजार

(D) वर्जन

45. सार्वजनिक वस्तू एका अधिकच्या व्यक्तीला उपलब्ध करून देण्याचा सीमांत व्यय ........... असतो.

(A) शून्य

(B) शून्य ते एक दरम्यान

(C) उणे एक ते शून्य दरम्यान

(D) उणे एक ते एक दरम्यान

46. बाह्यता म्हणजे एखाद्या बिगर उपभोक्त्याला ................. संबंधित वस्तूच्या किंमतीत अंतर्भूत नसते.

(A) झालेला व्यय जो

(B) मिळणारा लाभाचा घेतलेला आनंद जो

(C) झालेला व्यय किंवा लाभाचा घेतलेला आनंद जो

(D) उत्पादित वस्तूचा व्यय

47. Efficiency in distribution requires that :
    (A) Marginal rate of substitution between two goods are equal for all consumers
    (B) Marginal rate of technical substitution are equal for all firms
    (C) Marginal rate of technical substitution are unequal for all firms
    (D) Marginal rate of substitution are equal for all firms

48. If the budget surplus is to measure public saving in the sense of reduction in aggregate demand, surplus should be defined as ................. .
    (A) The excess of total expenditure over tax revenue
    (B) The excess of tax revenue over total expenditure
    (C) Equality of revenue and expenditure
    (D) Equality of debt and revenue

47. वितरणातील कार्यक्षमतेसाठी ..................... आवश्यकता भासते.
    (A) सर्व उपभोक्त्यांसाठी दोन वस्तूंमधील समान सीमांत पर्यायता दर
    (B) सर्व उद्योगसंस्थासाठी समान सीमांत तांत्रिक पर्यायता दर
    (C) सर्व उद्योगसंस्थांसाठी भिन्न सीमांत तांत्रिक पर्यायता दर
    (D) सर्व उद्योगसंस्थांसाठी समान सीमांत पर्यायता दर

48. जर अर्थसंकल्प आधिक्याचे एकूण मागणीच्या घटीच्या अर्थाने मापन करायचे असल्यास आधिक्याची व्याख्या ................... अशी करता येईल.
    (A) कर महसुलापेक्षा एकूण खर्च अधिक असणे
    (B) एकूण खर्चापेक्षा कर महसूल जास्त असणे
    (C) महसूल आणि खर्चाची समानता
    (D) कर्ज आणि महसुलाची समानता

49. The central instrument of expenditure policy is ................. .

(A) The cash reserve ratio

(B) Special drawing rights

(C) The budget

(D) Statutory liquidity ratio

50. Surplus finance generates ................ effect in the budget.

(A) A contraction

(B) Expansion

(C) Stabilization

(D) Monetization

51. When an expansionary fiscal policy is adopted .................. are lowered and .................... are increased.

(A) Tax rates and government spendings

(B) Government spendings and interest rates

(C) Subsidies and tax rates

(D) Tax rates and surcharges

49. खर्च धोरणाचे केंद्रीय साधन ................ आहे.

(A) रोख राखीव निधी

(B) विशेष आहरण अधिकार

